यंत्रणांनी प्रलंबित प्रकरणे आणि विकासकामांना गती द्यावी - जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. >> पान 2

चंद्रपूर महापालिकेत 'हाय सिवेज सक्शन मशीन' दाखल; आधुनिक तंत्रज्ञानाने स्वच्छतेला येणार वेग >> पान 3

अतिक्रमणाकडे दुर्लक्ष करणे ग्रामसेवकाला भोगले डोणगावचे ग्रामविकास अधिकारी दीपक तांबारे निलंबित >> पान 4

**सुविचार**
आपल्या निर्णयांमध्ये विचारशील व्हा.

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 293 ■ शनिवार, दि. 05 जुलै 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



बजरंगी भाईजानची मुन्नी दिसणार साऊथ चित्रपटात

आतील पान

# एकनाथ शिंदेंनी दिला 'जय गुजरात'चा नारा

## अमित शहांपुढे फोडले वादाला तोंड; विरोधी पक्षातील नेत्यांचा 'लोटांगण घातल्याचा आरोप'

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी: राज्यात मराठी भाषेच्या मुद्द्यावरुन वातावरण तापले असताना राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वत:च्याच चुकीने अंगावर नसते संकट ओढावून घेतले आहे. आज पुण्यातील कोंढवा कन्व्हेंशन सेंटरमधील कार्यक्रमात केंद्रीय मंत्री अमित शाह उपस्थित होते. यावेळी एकनाथ शिंदे यांनी नेहमीप्रमाणे अमित शाह यांच्या कौतुकाचे पाल्हाळ लावले होते. अमित शाह यांचे कौतूक करताना एकनाथ शिंदे हे अनेक विशेषणं आणि उपमांचा वापर करत होते. मात्र, या सगळ्याचा कहर झाला तो भाषणाच्या शेवटी. एकनाथ शिंदे यांनी भाषणाच्या शेवटी, 'जय हिंद, जय महाराष्ट्र', असे म्हटले. त्यानंतर एकनाथ शिंदे यांना काहीतरी आठवले आणि त्यांनी पुन्हा माईकपाशी येऊन 'जय गुजरात', असे म्हटले. एकनाथ शिंदे यांच्या या गुजरातच्या उल्लेखावरुन प्रचंड मोठा राजकीय वादंग निर्माण होण्याची शक्यता आहे.**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्यात एका सार्वजनिक कार्यक्रमात 'जय गुजरात' अशी घोषणा करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या जयराज स्पोर्ट्स अँड कन्व्हेन्शन सेंटरच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. या भाषणादरम्यान, एकनाथ शिंदे यांनी जय हिंद, जय महाराष्ट्र,जय गुजरात असा नारा दिला. त्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आणि आश्र्चर्याची भावना व्यक्त केली. महाराष्ट्रात होणाऱ्या मोठ्या राजकीय घडामोडींच्या पार्श्र्वभूमीवर शिंदे यांच्या या घोषणेला विशेष महत्त्व प्राप्त झालं आहे. या कार्यक्रमाला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, अनेक मंत्री, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि भाजप-





शिंदे गटाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'जय गुजरात' ही घोषणा महाराष्ट्राच्या भूमीत दिली गेल्याने यापुढे राजकीय चर्चांना अधिक उधाण येण्याची शक्यता आहे. दरम्यान, या घोषणेमागे कोणते राजकीय संकेत आहेत का, यावर अद्याप शिंदे किंवा त्यांच्या समर्थकांकडून कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, या एका घोषणेमुळे महाराष्ट्राच्या राजकारणात नवीन चर्चेचा विषय तयार झालेला आहे.

या कार्यक्रमात अमित शाह आणि देवेंद्र फडणवीस यांचीही भाषणे झाली. देवेंद्र फडणवीस आणि अमित शाहांनी आपल्या भाषणात थोरल्या बाजीराव पेशव्यांच्या पराक्रमाची महती कथन केली. अमित शाह या कार्यक्रमाचे आकर्षण केंद्र असले तरी हा कार्यक्रम संपल्यानंतर एकनाथ शिंदे हेच चर्चेचा विषय ठरले. एकनाथ शिंदे यांनी भाषणाच्या शेवटी 'जय गुजरात' का म्हटले, हा एकच प्रश्न सर्वतोमुखी होता. एरवी एकनाथ शिंदे हे आपल्या भाषणाचा शेवट असा करत नाहीत. मग नेमके आजच एकनाथ शिंदे यांना 'जय गुजरात' बोलण्याची बुद्धी कशी सुचली, याविषयी राजकीय वर्तुळात चर्चा रंगल्या आहेत.

## विद्यार्थ्यांना एसटी पास थेट शाळेत ! या योजनेला उस्फुर्त प्रतिसाद

**मुंबई/प्रतिनिधी :** १६ जुन पासून शाळा- महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनींना एसटीचे पास हे थेट त्यांच्या शाळेत वितरित करण्यात येत आहेत. केवळ १५ दिवसात म्हणजे १६ जुन ते ३० जुनपर्यंत तब्बल ५ लाख २१ हजार ३५४ विद्यार्थी - विद्यार्थिनींनी या योजनेचा लाभ घेतला आहे. अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष श्री. प्रताप सरनाईक यांनी दिली. मंत्री सरनाईक म्हणाले की, नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या सत्रातील शाळा १६ जुन पासून सुरू झाल्या.

घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून ६६.६६ज्ञब इतकी सवलत दिली आहे, म्हणजे केवळ ३३.३३ज्ञब रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येतो. या अंतर्गत १ लाख ६१ हजार २०४ विद्यार्थ्यांना त्यांच्या, त्यांच्या शाळेत जाऊन एसटी कर्मचाऱ्यांनी पास वितरित केले. त्याचप्रमाणे शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण केले जातात.

## पहिलीच्या वेळापत्रकातून 'हिंदी' हद्दपार

**मुंबई/प्रतिनिधी :** पहिल्या इयत्तेपासून हिंदी ही तिसरी भाषा म्हणून अनिवार्य करण्यासाठी झालेल्या विरोधानंतर राज्य सरकारने तिर्सया भाषेचा जीआर रद्द केला आहे. त्याचप्रमाणे राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या (एससीईआरटी) नव्या वेळापत्रकातूनही तिसरी भाषा हद्दपार झाली आहे. त्यामुळे आता मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळामध्ये फक्त दोनच भाषा शिकवल्या जाणार असून तिसऱ्या भाषेची सक्ती असणार नाही. त्याबरोबरच तिसऱ्या भाषेच्या समावेशानंतर कमी केलेला कला, क्रीडा आणि कार्यानुभवाचा वेळ वाढवण्यात आला असून शाळांनी लवकरात लवकर विषयनिहाय तासिका विभागणीच्या आधारे वेळापत्रक तयार करावे, असे सुचवण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे ८ मार्च २०२४ च्या शासन आदेशानुसार सक्तीचे झाले आहे. राज्यातील सर्व शाळांत यासंबंधीचा आदेश अंमलात आला आहे. हिंदी सक्तीची करण्याचा आदेश रद्द करणारा जीआर गुरुवारी काढला गेला.

## संसदेचे पावसाळी अधिवेशन २१ जुलैला सुरू होणार, राष्ट्रपतींनी दिली मंजुरी

नवी दिल्ली : संसदेचे पावसाळी अधिवेशन २१ जुलैपासून सुरू होणार असून, २१ ऑगस्टपर्यंत चालणार आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सरकारच्या प्रस्तावाला मान्यता दिलीय, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली. पूर्वी हे अधिवेशन १२ ऑगस्ट रोजी संपणार असल्याचं सांगितलं जात होतं, परंतु आता ते एका आठवड्यासाठी वाढवण्यात आलंय. पहलगाम हल्ल्यानंतर सुरू होणारे हे संसद अधिवेशन खूप गोंधळाचे ठरणार आहे. २०२५ च्या पावसाळी अधिवेशनासाठी संसदेचे २६८ वे अधिवेशन सोमवार २१ जुलै रोजी सुरू होणार आहे. खास सदस्य पोर्टलद्वारे सदस्यांना समन्स जारी करण्यात आले होते आणि सर्वांना पावसाळी अधिवेशनाच्या आगामी कार्यक्रम आणि कामकाजाच्या दिवसांची माहिती देण्यात आली होती.

सदस्य पोर्टलला भेट देण्याचा सल्ला : मिळालेल्या माहितीनुसार, अधिवेशन २१ जुलैपासून सुरू होईल आणि २१ ऑगस्टपर्यंत चालेल, ज्यामध्ये सभागृह १२ ऑगस्ट रोजी तहकूब होईल आणि १८ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनाच्या समारंभासाठी पुन्हा बैठक होणार आहे. बैठकीची वेळ सकाळी ११ ते दुपारी १ आणि दुपारी २ ते संध्याकाळी ६ पर्यंत निश्चित करण्यात आली आहे. राज्यसभेच्या २०२५ च्या पावसाळी अधिवेशनात प्रमुख कायदेविषयक चर्चा आणि वादविवादांचा समावेश असण्याची अपेक्षा आहे. संसद सदस्यांना अधिवेशनाबाबत अद्ययावत माहिती, परिपत्रके आणि अतिरिक्त सूचनांसाठी नियमितपणे सदस्य पोर्टलला भेट देण्याचा सल्ला देण्यात आलाय.

अधिवेशन २१ जुलै ते २१ ऑगस्ट कालावधीत घेण्याच्या प्रस्तावाला मान्यता : दरम्यान, केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी बुधवारी सांगितले की, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संसदेचे पावसाळी अधिवेशन २१ जुलै ते २१ ऑगस्ट या कालावधीत घेण्याच्या प्रस्तावाला मान्यता दिलीय.

## त्या वृद्ध शेतकरी दाम्पत्यासाठी तुपकरांची क्रांतिकारी शेतकरी संघटना सरसावली..!

### वृद्धाच्या खांद्यावरील उतरवला जू! वर्गणीतून दिली बैलजोडी

### कार्यकर्त्यांनी वाजतगाजत नेऊन बैलांना जुंपले औताला : वृद्ध दाम्पत्याचा तुपकरांशी फोन वरुन संवाद.. डोळे पाणावले..!

दैनिक आपला विदर्भ






**बुलढाणा/प्रतिनिधी :** बैल नाही म्हणून वृद्ध शेतकरी औत ओढतोय आणि पत्नी कोळपणी करतेय... हा बळीराजाच्या दुर्दशेची विदारक कहाणी मांडणारा व्हिडीओ महासत्तेचे स्वप्न पाहणाऱ्या भारत देशातील केंद्र आणि राज्य सरकारच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालणारा आहे. राज्यकर्त्यांनी मदत देऊ, अशा नुसत्याच वल्गना केल्या. प्रत्यक्षात मदतीचा हात पुढे आला नाही. मात्र, खऱ्या दातृत्वाची भावना काय असते, कृतिशील मदत कशी करावे लागते हे फक्त शेतकरीपुत्रांची संघटना असलेल्या क्रांतिकारी शेतकरी संघटनेने दाखवून दिले आहे. लातूर जिल्ह्यातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी एक लाख रुपयांची वर्गणी जमवून बैलजोडी देऊन त्या वृद्ध शेतकऱ्याच्या खांद्यावरील जू उतरविले. कार्यकर्त्यांनी वाजतगाजत बैलजोडी शेतात नेऊन शेतकरी अंबादास गोविंद पवार यांच्या हाती कासरे दिले.

## वारीत अर्बन नक्षलवादी घुसल्याचं मनीषा कायंदेंचं वक्तव्य, रोहित पवारांना झोंबलं

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शिवसेना आमदार मनीषा कायंदेंनी आषाढी वारीबद्दल केलेलं वक्तव्य विरोधकांना झोंबलेलं दिसत आहे. वारीत काही संघटनांच्या मार्फत अर्बन नक्षलवादी घुसल्याचे मनीषा कायंदेंच्या वक्तव्यावर विजय वडेट्टीवारनंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी देखील प्रतिक्रिया दिली.



आज पावसाळी अधिवेशनाच्या पाचव्या दिवशी प्रसारमाध्यमांसमोर रोहित पवार वारकरी वेशात आले, सोबत संविधानाची प्रत त्यांनी घेतली होती, यादरम्यान त्यांनी शिवसेना आमदार मनीषा कायंदे यांनी केलेल्या वक्तव्यावर आपली प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले ''गेल्या काही दिवसांपासून काही आमदार राजकीय नेत्यांना खुश करण्यासाठी तसेच एका वेगळ्या पद्धतीचे वातावरण या महाराष्ट्रात निर्माण व्हावं याचा प्रयत्न करू पाहत आहेत. ज्यामुळे संविधानाच्या विरोधात असलेला जनसुरक्षा कायदा राज्यात लागू करणे सोपे जाईल, असे त्यांना वाटत आहे. मात्र यासाठी ते वारकऱ्यांना आणि पवित्र वारीला बदनाम करू पाहत आहे.'' रोहित पवार यांनी असे विधान करताना आमदार मनीषा कायंदे यांचे नाव घेणे जाणीवपूर्वक टाळले.

शिवसेना आमदार डॉ. मनीषा कायंदे यांनी विधान परिषदेत एक महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यांनी सांगितले की पंढरपूरच्या वारीत देवाला न मानणारे आणि अर्बन नक्षली घटकांनी शिरकाव केला आहे. या घटकांमुळे वारीच्या पवित्रतेला धक्का पोहोचण्याची शक्यता व्यक्त करत त्यांनी तातडीने कारवाईची मागणी केली आहे.

डॉ. कायंदे यांनी विधान परिषदेत भाषण करताना सांगितले की वारी ही केवळ एक धार्मिक परंपरा नसून ती महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आणि आध्यात्मिकतेचा आधार आहे. शतकानुशतके चालत आलेली ही परंपरा निमर्ळ आणि पवित्र राहिली पाहिजे. परंतु काही घटक या पवित्र परंपरेचा गैरवापर करून आपला राजकीय अजेंडा पुढे करण्याचा प्रयत्न करत आहेत.

## संभाजीनगरातील काळा गणपती भागात कारने सहाजणांना उडवले; एकाचा मृत्यू

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** शहरातील काळा गणपती भागात एका कारने सकाळी ९.१५ च्या सुमारास सहा जणांना उडविले. या अपघातामध्ये ७० वर्षाच्या एका व्यक्तीचा मृत्यू झाला. गुणाजी लक्ष्मण शेवाळे असे मृत व्यक्तीचे नाव आहे. अन्य दोनजण गंभीर जखमी झाल्याचे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले. भरधाव वेगाने जाणाऱ्या या कारने अनेकांना उडविल्याने खळबळ उडाली. काळा गणपती भागात येणाऱ्या भाविकावर गाडी घालणारा या व्यक्ती कोण याचा तपास पोलीस घेत आहेत. या अपघातानंतर मोठी वाहतूक कोंडी झाली. कार क्र एम.एच २० एचएच ०७४६ सिडको बसस्थानाकडून काळा गणपतीकडे जात असताना सहा जणांने चालकाने उडवले. दोन गंभीर जखमींना रुग्णालयात हलविण्यात आले. अपघातानंतर कारचालक पळून गेला. सिडको भागातील ही कार असावी असे सांगण्यात येत आहे.

## भूमी गैरव्यवहार प्रकरणी उपविभागीय अधिकाऱ्याचे निलंबन!; बावनकुळेंची विधानसभेत घोषणा

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** नाशिक जिल्ह्यातील संगमेश्वर येथील भूमाफियांनी केलेल्या सिटी सर्व्हे क्रमांक १४४ भूखंडाच्या फसवणुकीप्रकरणी उपविभागीय अधिकारी उदय किसवे यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यांच्यावर येत्या एका महिन्यात विभागीय चौकशी करून कठोर कारवाई करण्यात येईल, अशी घोषणा राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात केली. भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी विचारलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी ही माहिती दिली.

## मंगरुळपीरमध्ये बालकामगार मुक्ती मोहिम राबवली; तीन बालकांची सुटका

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी :** जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांच्या निर्देशानुसार व बाल व किशोरवयीन कामगार प्रतिबंध व नियमन अधिनियम, १९८६ (सुधारणा २०१६) अंतर्गत मंगरुळपीर येथे ३ जुलै २०२५ रोजी विशेष धाडसत्र राबविण्यात आले. या मोहिमेदरम्यान दोन आस्थापनांवर छापा टाकून तीन बालकामगारांची मुक्तता करण्यात आली.

या कारवाईत आई जगदंबा ऑटोमोबाईल्स अँड सर्विसिंग सेंटर ( श्याम लुंगे) आणि भोलेनाथ मोटार गॅरेज (अक्षय राऊत) या आस्थापनांमध्ये बालकामगार कार्यरत असल्याचे आढळले. कृती दलाने तत्काळ बालकामगारांची सुटका करून संबंधित मालकांविरुद्ध मंगरुळपीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. सदर मोहिमेमागील उद्देश म्हणजे बालकामगार या अनिष्ट प्रथेचे समुळ उच्चाटन करणे. यावेळी आस्थापनांना बालकामगार न ठेवण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. या कारवाईसाठी कामगार उपआयुक्त अमरावती चंद्रकांत राऊत, सहाय्यक कामगार आयुक्त अकोला राहुल



काळे, सहाय्यक कामगार आयुक्त अमरावती श्रीमती श्रद्धा वाघमारे, तसेच सरकारी कामगार अधिकारी वाशिम पंकज खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली कृती दल कार्यरत होते. कारवाईत योगेश गोटे (शॉप इन्स्पेक्टर), निलिमा भोंगाडे (चाईल्ड हेल्पलाईन), श्रीमती शबनम नंदावाले (पोलीस कॉन्स्टेबल), समीर शेख (पोलीस कॉन्स्टेबल) तसेच किशोर शेळके (पोलीस निरीक्षक) आणि काळे सर (एपीआय) यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

सरकारी कामगार अधिकारी वाशिम यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, बालकामगार प्रथा रोखण्यासाठी सहकार्य करावे आणि कुठेही बालकामगार आढळल्यास त्वरित तक्रार नोंदवावी.असे आवाहन कामगार विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# यंत्रणांनी प्रलंबित प्रकरणे आणि विकासकामांना गती द्यावी - जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस.

## समन्वय समितीची बैठक संपन्न




**दैनिक आपला विदर्भ**

**वाशीम/प्रतिनिधी :** प्रशासनाच्या कार्यक्षमतेसह सर्व संबंधित यंत्रणांमधील समन्वय अत्यावश्यक ठरतो. जिल्ह्यातील यंत्रणांनी प्रलंबित प्रकरणे आणि विकासकामांना गती द्यावी,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस यांनी केले.

आज ४ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समन्वय सभा पार पडली.यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी परिविक्षाधीन जिल्हाधिकारी आकाश वर्मा,अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्ह्यातील विविध प्रलंबित प्रकरणे आणि विकासकामांना गती देण्यासाठी ही सभा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये जलजीवन मिशन, सौर कृषी वाहिनी, रुग्णालयांचे ऑडिट, टीबी रुग्णांना दत्तक घेण्याचे आवाहन आणि सौरऊर्जा जनजागृती यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. या सभेला जिल्ह्यातील सर्व यंत्रणा प्रमुख, तहसीलदार, गटविकास अधिकारी आणि इतर विभागांचे प्रमुख दृकश्राव्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

प्रलंबित प्रकरणांवर तात्काळ कार्यवाहीचे निर्देश : जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस. यांनी सर्व विभागांना प्रलंबित प्रकरणे तात्काळ मार्गी लावण्याचे निर्देश दिले.

विशेषतः, जलजीवन मिशन अंतर्गत जमिनीशी संबंधित प्रकरणे त्वरित निकाली काढण्यावर त्यांनी भर दिला. तसेच सौर कृषी वाहिनीच्या कामांना प्राधान्य देण्याचे आवाहनही त्यांनी केले. आम्ही पत्र पाठवूनही संबंधित विभागाकडून उत्तर मिळाले नाही किंवा कार्यवाही झाली नाही, ही बाब खेदजनक आहे, असे नमूद करत, दर शुक्रवारी आयोजित होणाऱ्या समन्वय सभेत सर्वांनी अडचणींचे निराकरण करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.रुग्णालयांचे तात्काळ ऑडिट आणि जागेची आवश्यकता: जिल्ह्यातील सर्व रुग्णालयांमध्ये फायर ऑडिट, स्ट्रक्चरल ऑडिट आणि इलेक्ट्रिकल ऑडिट तात्काळ पूर्ण करण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. यामध्ये कारंजा आणि वाशीम येथील रुग्णालयांवर विशेष लक्ष देण्यास सांगण्यात आले. याव्यतिरिक्त, विभागांना कार्यालयांसाठी जागेची आवश्यकता असल्यास ती मागणी करावी किंवा नसल्यास ना हरकत प्रमाणपत्र द्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले. टीबी रुग्णांना दत्तक घेण्याचे आवाहन: सामाजिक बांधिलकीचे आवाहन सभेत जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. परभणकर यांनी टीबी रुग्णांना दत्तक घेण्याचे कळकळीचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की, शासनाकडून टीबी रुग्णांना दरमहा एक हजार रुपये दिले जातात, परंतु त्यांच्या आहारासाठी प्रोटीनयुक्त आणि अनुषंगिक पोषणाची गरज आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अशा रुग्णांना दत्तक घेण्याचे आवाहन केले असल्याचे सांगत, सर्व अधिकाऱ्यांना स्वतः यामध्ये सहभागी होण्यास आणि इतरांनाही प्रेरित करण्यास सांगितले. जिल्हाधिकाऱ्यांनीही या आवाहनाला पाठिंबा देत सर्वांनी टीबी रुग्णांच्या मदतीसाठी पुढे यावे, असे सांगितले.

### सौरऊर्जेला प्रोत्साहन आणि जनजागृती

सौरऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी महत्त्वपूर्ण सूचना केल्या. पाच हजार लोकसंख्येची गावे १०० टक्के सौरऊर्जेवर आधारित झाल्यास शासनाकडून एक कोटी रुपयांचे बक्षीस दिले जाते, असे सांगत त्यांनी गटविकास अधिकाऱ्यांना मोठ्या गावांमध्ये जनजागृती करून अशी गावे तयार करण्याचे निर्देश दिले. तसेच, महास्ट्राईड अंतर्गत सर्व विभागांनी आपली माहिती डी.एस.यु.चे अमीन यांच्याकडे सादर करून कार्यालयांचे नियोजन करण्याचे आवाहनही त्यांनी केले.या सभेत जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व यंत्रणांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज जिल्हाधिकाऱ्यांनी अधोरेखित केली. प्रलंबित कामे, जनजागृती आणि सामाजिक उपक्रमांना प्राधान्य देत जिल्ह्याचा विकास साधण्याचा निर्धार यावेळी व्यक्त झाला. यावेळी विविध यंत्रणा प्रमुखांची उपस्थिती होती.

## भारताला शह देण्यासाठी चीन - पाकिस्तानची नवी खेळी

साऊथ एशियन असोसिएशन फॉर रिजनल कॉर्परेशन अर्थात ' सार्क' ही दक्षिण आशियाई देशांची शिखर संघटना १९८५ साली स्थापन झाली. दक्षिण आशियाई देशात सहकार्य विकसित करण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर दक्षिण आशियाई देशांचा दबावगट निर्माण करण्यासाठी या संघटनेची स्थापना झाली. ही संघटना स्थापन करण्यात भारताचे मोलाचे योगदान होते किंबहुना भारताच्या पुढाकारानेच ही संघटना स्थापन झाली म्हणूनच सुरुवातीपासूनच या संघटनेवर भारताचे वर्चस्व होते. २०१५ सालापर्यंत या संघटनेची दरवर्षी सहयोगी सदस्य असलेल्या देशात शिखर परिषद आयोजित केली जायची. २०१६ साली या संघटनेची पाकिस्तान येथे शिखर परिषद आयोजित करण्यात आली होती मात्र शिखर परिषद होण्याआधीच पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी जम्मू काश्मिरच्या उरी येथील लष्करी तळावर भ्याड हल्ला केला त्यामुळे दोन्ही देशातील संबंध बिघडले त्या पार्श्र्वभूमीवर भारताने या शिखर परिषदेसाठी पाकिस्तानात जाण्यास नकार दिला. भारताने नकार दिल्याने अन्य देशांनीही पाकिस्तानात जाण्यास नकार दिला त्यामुळे त्यावर्षी शिखर परिषद रद्द करण्यात आली. त्यानंतरही दोन्ही देशांतील संबंध तणावपूर्णच राहिले. या दरम्यान सार्क संघटनेतील बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ या देशातही मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या. तेथील सरकार उलथून टाकण्यात आले. नवीन सरकारे अस्तित्वात आली त्यामुळे सार्क परिषदेची बैठक होऊ शकली नाही. आता तर सार्क संघटना मरणासन्न अवस्थेत आहे. ही संघटना असून नसल्यागत आहे त्यामुळे दक्षिण आशियाई देशांवर भारताचे जे वर्चस्व होते ते देखील कमी झाले. दक्षिण आशियामधील भारताचा प्रभाव कमी झाला याचाच फायदा चीन आणि पाकिस्तान यांनी घेण्याचे ठरवले. काही दिवसांपूर्वी चीनमधील कुणमिंग या शहरात चीन, बांगलादेश आणि पाकिस्तान या तीन देशांची त्रिपक्षीय चर्चा पार पडली. या चर्चेचा मुख्य अजेंडा होता सार्कला पर्याय देणारी नवीन संघटना उभारणे. या त्रिपक्षीय बैठकीबाबतची बातमी पाकिस्तानी आणि बांगलादेशी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली आहे. दक्षिण आशियात असलेला भारताचा प्रभाव कमी करणे. ही संघटना उभारून भारताला शह देणे हाच उद्देश ही नवी संघटना उभारण्यामागे या दोन्ही देशांचा आहे. चीन, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, मालदीव आणि अफगाणिस्तान या देशांचा या नव्या संघटनेत समावेश करण्याच्या हालचाली सुरू आहे. भारताला फक्त निमंत्रित सदस्य म्हणून या संघटनेत ठेवले जाणार आहे असेही या बातमीत म्हटले आहे अर्थात चीन पाकिस्तानने उभारलेल्या या संघटनेत भारत निमंत्रित सदस्य म्हणून सहभागी होण्याची सुतराम शक्यता नाही. दक्षिण आशिया मध्ये असणारा भारताचा प्रभाव कमी करण्यासाठीच चीन आणि पाकिस्तानचा हा सर्व खटाटोप चालू आहे. त्यांना बांगलादेशचीही साथ मिळत आहे. गेल्या काही दिवसात बांगलादेश आणि भारताचे संबंध देखील बिघडले आहेत त्याचाच फायदा घेत या दोन्ही देशांनी बांगलादेशला आपल्या बाजूने वळवले आहे. केवळ बांगलादेशच नाही तर श्रीलंका, मालदीव आणि अफगाणिस्तान यांनाही आपल्या बाजूने करून घेण्यासाठी त्यांना या संघटनेत घेतले जाणार आहे. मागील वर्षी मालदीव आणि भारताच्या संबंधात ही तणाव निर्माण झाला होता. श्रीलंकेचे विद्यमान राष्ट्रप्रमुख हे चीन धार्जिणेच आहेत. अफगाणिस्तानशी जरी भारताचे संबंध सौहादपूर्ण असले तरी तेथील तालिबानी सरकारला भारताने अजूनही अधिकृत मान्यता दिलेली नाही या पार्श्र्वभूमीवर या देशांना आपल्या बाजूने वळवून त्यांची एक शिखर संघटना स्थापन करण्याचा निर्णय या दोन्ही देशांनी घेतलेला दिसतोय. अर्थात भारत चीन आणि पाकिस्तानचा हा डाव ओळखून आहे. या तीन देशात झालेल्या चर्चेची भारताने गांभीर्याने नोंद घेतली असून भारताचे परराष्ट्रमंत्री एस जयशंकर यांनी भारताच्या शेजारी असणाऱ्या देशांना सूचक इशारा देताना म्हटले आहे की शेजारी देशांना भारताशी सहकार्य करण्याचे लाभ मिळतात आणि हे सहकार्य नाकारण्याची किंमतही चुकती करावी लागते. एस जयशंकर यांचा हा इशारा या नव्या संघटनेत सामील होणाऱ्या देशांनाच होता. भारताने या संघटनेत सामील होणाऱ्या देशांना केवळ इशारा देऊन उपयोग नाही तर त्यांना त्यांची जागाही दाखवून द्यायला हवी. भारताच्या शेजारी असलेले हे देश त्यांना गरज असताना भारताला मदतीची याचना करतात. भारताशी मैत्रीचे नाटक करतात मात्र जेव्हा त्यांची गरज संपते तेव्हा भारताला विसरून चीनच्या कच्छपी लागतात. गरज सरो वैद्य मरो अशीच भारताच्या शेजारी देशांची भूमिका असते.

# शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकाऐवजी फळबाग, भाजीपाला व आधुनिक लागवडीकडे वळावे!

## आर्थिक स्तर उंचावण्यासाठी फायदेशीर ; शासकीय योजनांचा घ्या लाभ

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी आता पारंपरिक पीकपद्धतीऐवजी आधुनिक आणि अधिक फायदेशीर शेतीकडे वळण्याची गरज आहे. कापूस आणि सोयाबीन या पारंपरिक पिकांवर अति अवलंबित्व व अनेकदा अनिश्चित हवामान, बाजारातील चढउतार आणि वाढत्या उत्पादन खर्चामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडतात. तर दुसरीकडे यावर मात करत फळबाग, भाजीपाला, बियाणे उत्पादन, चिया लागवड आणि रेशीम शेती सारख्या नगदी पिकांची लागवड करुन आर्थिक स्तर उंचावला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी शेतकऱ्यांनी पारंपरिक पिकाऐवजी फळबाग, भाजीपाला व आधुनिक लागवडीकडे वळावे, आवाहन जिल्हा कृषी विभागाने केले आहे.

बुलढाणा जिल्ह्याची जमीन आणि हवामान अनेक विविध पिकांसाठी अनुकूल आहे. तरीही, बहुतेक शेतकरी कापूस आणि सोयाबीन पीकांवर अवलंबून राहतात. या पिकांवर येणारे रोग, किडींचा प्रादुर्भाव आणि हमीभावाची अनिश्चितता यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. या पार्श्वभूमीवर, शेतीत विविधता आणणे ही काळाची गरज आहे. यासाठी नव्या संधी, नवा विचारांची गरज असून फळबाग लागवड, भाजीपाला उत्पादन, बियाणे उत्पादन, चिया लागवड, रेशीम शेती यांसारख्या पिकांमधून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यास मदत होईल. फळबाग लागवडीत आंबा, पेरू, डाळिंब, सीताफळ इ. आणि भाजीपाला उत्पादनात स्थानिक आणि शहरी बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात मागणी असलेल्या भाजीपाल्याचे उत्पन्न घ्यावे. याशिवाय, पिकांच्या प्रमाणित बियाण्यांच्या मागणीत सातत्याने वाढ होत आहे. बियाणे उत्पादन हे तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक असले तरी, यात अधिक चांगला नफा मिळण्याची क्षमता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी कृषी विद्यापीठे आणि कंपन्यांच्या मार्गदर्शनाखाली बियाने उत्पादन घ्यावे. यासोबतच, चिया लागवड, रेशीम शेती (मलगोळी पालन) हे शाश्वत उत्पन्नाचे अत्यंत फायदेशीर साधन आहे. ही शेती आता जिल्ह्यात विविध भागांत राबविण्यात येत आहे. बदलत्या हवामान परिस्थितीत रेशीम लागवड हा एक उत्तम पर्याय ठरत असल्याने शेतकऱ्यांनी रेशीम शेतीला प्राधान्य द्यावे, असे आवाहन देखील कृषी विभागाने केले आहे.

> ''बुलढाणा जिल्ह्याच्या शेतकरी बांधवांनो, पारंपरिकतेला फाटा देत आधुनिकतेचा स्वीकार करा. फळबाग, भाजीपाला, बियाणे उत्पादन, चिया लागवड आणि रेशीम शेती सारख्या पीक पद्धती आपली शेती समृद्ध करतील आणि आपल्या जीवनात आर्थिक स्थैर्य आणतील!''
>
> **–जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे, बुलढाणा**

> ''बुलढाणा जिल्ह्याच्या प्रगतीचा मार्ग शेतीच्या आधुनिकीकरणातून जातो. पारंपरिक पिकांच्या पलीकडे जाऊन, फळबाग, भाजीपाला आणि नगदी पिकांच्या लागवडीचा स्वीकार करा. शासन तुमच्या पाठीशी आहे, चला एकत्र येऊन जिल्ह्याला समृद्ध करूया!''
>
> **– जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील, बुलढाणा**

शासकीय योजनांचा लाभ घ्या: कृषी क्षेत्राच्या विकासासाठी कृषी विभागाच्या योजना कार्यान्वित आहेत. फळबाग लागवड, सूक्ष्म सिंचन आणि इतर आधुनिक शेती पद्धतींसाठी विविध योजना आणि अनुदान उपलब्ध करून दिला जात आहे. शेतकऱ्यांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी जवळील कृषी विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

पारंपरिक पिकांवरील अवलंबित्व कमी करून, फळबाग, भाजीपाला, बियाणे उत्पादन, चिया लागवड आणि रेशीम शेती सारख्या पर्यायांचा अवलंब केल्यास बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे.

आर्थिक ताळमेळानुसार पारंपरिक पिकांवरील अवलंबित्व कमी करून आधुनिक, नगदी आणि मागणी असलेल्या पिकांकडे वळणे हे आर्थिकदृष्ट्या अधिक फायदेशीर ठरत आहे. या बदलामुळे शेती अधिक शाश्वत आणि फायदेशीर बनत आहे.

## शिर्डीत ९ ते ११ जुलैदरम्यान गुरुपौर्णिमा उत्सव; तीन लाखांहून अधिक भाविक घेणार दर्शन, मुख्य दिवशी साई मंदिर रात्रभर खुलं

**शिर्डी /प्रतिनिधी :** साईबाबा संस्थानच्या वतीनं यंदा ९ ते ११ जुलै या कालावधीत गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात येणार आहे. यासाठी सर्व तयारी पूर्ण झाली आहे. उत्सवानिमित्त देश-विदेशातील लाखो साईभक्त शिर्डीमध्ये दाखल होणार असून संस्थानकडून विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे, अशी माहिती साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी दिली. साईबाबा संस्थानच्या वतीनं ९ ते ११ जुलै असा तीन दिवसीय गुरुपौर्णिमा उत्सव मोठ्या भक्तीमय वातावरणात शिर्डीत साजरा करण्यात येणार असून या उत्सवात तीन लाखांहून अधिक भाविक शिर्डीत साईबाबांच्या समधीचं दर्शन घेतील अशी व्यवस्था साई संस्थानकडून करण्यात आली आहे. या उत्सवासाठी संस्थानकडून देशभरातील १ लाख ६६ हजार भक्तमंडळ सदस्यांना निमंत्रणपत्रिका पाठवली असून ३ लाख ५० हजार देणगीदार भक्तांना ई-मेलद्वारे आमंत्रण देण्यात आलय. तसंच यंदा गुरुपौर्णिमा उत्सवानिमित्ता अमेरिकेतील साईभक्त सुब्बा पै यांच्या देणगीतून साईबाबा समाधी मंदिर आणि मंदिर परिसराची आकर्षक फुलांनी सजावट केली जाणार आहे.

# एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान औषधी व सुगंधी वनस्पती लागवडीसाठी ५० हजार ते १.५० लाखांपर्यंत अनुदान

## ३३.५० लाख रुपयांच्या वार्षिक कृती आराखड्यास मंजुरी ; महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करा- मनोजकुमार ढगे यांचे आवाहन

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानअंतर्गत औषधी व वनस्पती लागवड हा घटक नव्याने समाविष्ट करण्यात आला असून याअंतर्गत ५० हजार ते १.५० लाखांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. इच्छूक शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर फलोत्पादन या घटकाखाली अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

केंद्र पुरस्कृत औषधी वनस्पतींचे संवर्धन, विकास व शाश्वत व्यवस्थापन या योजनेअंतर्गत २०१५-१६ पासून राष्ट्रीय आयुष अभियान कार्यक्रम महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ मार्फत राबविण्यात येत होता. सदर योजनेअंतर्गत सन २०१५-१६ ते २०१९-२० या कालावधीमध्ये ८१८.२३ हेक्टर क्षेत्रावर औषधी वनस्पतीची लागवड करण्यात आलेली असून त्याकरिता रक्कम ४१५.१२ लाख रुपये एवढे अनुदान अदा करण्यात आलेले आहे. तथापि सन २०२०-२१ पासून औषधी वनस्पती घटक हा राष्ट्रीय आयुष अभियानाचा घटक नसल्याचे तसेच सन २०२१-२२ पासून औषधी वनस्पती लागवड योजना बंद करण्यात आली असल्याचे केंद्र शासनाने कळविले आहे. हा घटक आयुष मंत्रालयाकडून कृषी मंत्रालयाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे.

तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभार्थ्यांच्या सलग शेतावर, शेताच्या बांधावर व पडीक जमिनीवर अमृत महोत्सवी फळझाड किंवा वृक्ष लागवड व फुलपिक लागवड कार्यक्रम राबवण्याबाबत राज्य शासनाकडून निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयान्वये अर्जुन, असान, अशोका, बेहडा, हिरडा, बेल, टेटू, डिकेमाली, रक्तचंदन, रिठा, लोध्रा, आईन, शिवन, गुग्गुळ, बिब्बा व करंज या १६ वृक्षवर्गीय औषधी वनस्पतींना अनुदान देय आहे.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये औषधी व वनस्पती लागवड हा घटक नव्याने समाविष्ट करण्यात आलेला आहे. औषधी व सुगंधी वनस्पती लागवड या घटकाकरिता केंद्र शासनाने सन २०२५-२६ मध्ये रक्कम ३३.५० लाख रुपये एवढ्या रकमेच्या वार्षिक कृती आराखड्यास मंजुरी दिलेली आहे. औषधी व सुगंधी वनस्पतीचे पीक निहाय आर्थिक मापदंड ठरविण्यात आले आहेत.

**कोणत्या वनस्पतींना मिळतो अनुदान ?**

**औषधी वनस्पती :-** जेष्ठमध/मुलेठी, शतावरी, कालिहारी/कळलावी सफेद मुसळी, गुग्गुळ, मंजीष्टा, कुटकी, अतिस जटामासी, अश्वगंधा, ब्राम्ही, तुलसी, विरादीगंध, पिंपळी, चिराठा पुष्कर मूळ मापदंड : रु १.५० लाख प्रति हेक्टर, देय अर्थसहाय्य प्रति हेक्टर: सर्वसाधारण क्षेत्रांमध्ये ४०% आणि अधिसूचित क्षेत्रामध्ये ५०% अर्थसहाय्य. लागवड साहित्य व आयआयएम किंवा आयपीएमचा खर्च दोन हप्त्यामध्ये (२ हेक्टर च्या मर्यादित)

**महाग सुगंधी वनस्पती :-** गुलाब, रोझमेरी, निशिगंध, जिरेनियम, कॅमोमाइल, चंदन, दवणा, जाई, लव्हेंडर मापदंड : रु १.२५ लाख प्रति हेक्टर, देय अर्थसहाय्य प्रति हेक्टर: सर्वसाधारण क्षेत्रांमध्ये ४०% आणि अधिसूचित क्षेत्रामध्ये ५०% अर्थसहाय्य. लागवड साहित्य व आयआयएम किंवा आयपीएम चा खर्च दोन हप्त्यामध्ये (२ हेक्टर च्या मर्यादित)

**इतर सुगंधी वनस्पती :-**पामरोसा, गवती चहा, तुळस, व्हेटीव्हर, जावा, सिट्रोनेला, गोड तुळशी पत्र मापदंड : रु ५० हजार प्रति हेक्टर, देय अर्थसहाय्य प्रति हेक्टर: सर्वसाधारण क्षेत्रांमध्ये ४०% आणि अधिसूचित क्षेत्रामध्ये ५०% अर्थसहाय्य. लागवड साहित्य व आयआयएम किंवा आयपीएमचा खर्च दोन हप्त्यामध्ये (२ हेक्टर च्या मर्यादित)

औषधी व सुगंधी वनस्पती लागवड करू इच्छिणाऱ्या अधिकाधिक शेतकऱ्यांनी महाडीबीटी mahadbtmahait.gov.in या पोर्टलवर फलोत्पादन या घटकाखाली अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

''सर्व शेतकरी बांधवांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करावेत. आपला जिल्हा औषधी आणि सुगंधी वनस्पतींच्या लागवडीत अग्रेसर व्हावा, यासाठी प्रशासनाचे पूर्ण सहकार्य राहील.''

**– जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील,बुलढाणा**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### देऊळगाव राजा तालुक्यातील ४८ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाची आरक्षण सोडत ९ जुलैला

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या अधिसूचनेनुसार, देऊळगाव राजा तालुक्यातील एकूण ४८ ग्रामपंचायतींसाठी सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या व मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियमामधील तरतुदींनुसार हा कार्यक्रम पार पाडण्यात येणार आहे.

आरक्षण सोडत सन २०२५ ते २०३० या कालावधीत सार्वत्रिक निवडणुकांद्वारे गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतींमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय तसेच खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याच्या दृष्टीने होणार आहे. आरक्षण सोडतीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विविध समाजघटकांचे सशक्तीकरण आणि प्रतिनिधित्व सुनिश्चित होणार आहे.

ही आरक्षण सोडत दि ९ जुलै रोजी सकाळी ११ वाजता घेण्यात येणार असून, देऊळगाव राजा तालुक्यातील सर्व लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तहसीलदार, देऊळगाव राजा यांनी केले आहे.

### मारहाणीच्या तावडीतून चिमुकलीची सुटका; चाईल्ड हेल्पलाईन व पोलिसांची संयुक्त कारवाई

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** खामगाव रोडवरील लक्ष्मी हार्डवेअर जवळील रस्त्याच्या कडेला झोपडी करून राहणाऱ्या पाच वर्षीय चिमुकलीवर तिची आजी आणि एका गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीने दारूच्या नशेत बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात चाईल्ड हेल्पलाईन १०९८, जिल्हा बाल संरक्षण कक्ष बुलडाणा व चिखली शहर पोलिस स्टेशन यांच्या संयुक्त कारवाईत बालिकेची सुटका करण्यात आली आहे.

बालिकेवर होत असलेल्या अत्याचाराची माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून चाईल्ड हेल्पलाईनला मिळताच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अमोल डिधुळे व जिल्हा बाल संरक्षण अधिकारी दिवेश मराठे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प समन्वयक शेख सोहेल व पर्यवेक्षक सागर नरवाडे घटनास्थळी पोहोचले.

तेथे तपासणीअंती चिमुकलीवर तिच्या आजीने आणि एका पुरुषाने दारूच्या नशेत अत्याचार केल्याचे निदर्शनास आले. प्रकल्प समन्वयकांनी त्वरित चिखली शहर पोलिस स्टेशन व बाल कल्याण समिती, बुलडाणा यांना माहिती देण्यात आली. यानंतर पोलिस निरीक्षक संग्राम पाटील यांच्या नेतृत्वाखाली चाईल्ड हेल्पलाईन व पोलिसांचे संयुक्त पथक त्वरित घटनास्थळी पोहचले. तीन तासांच्या शोधमोहीमेनंतर, चिमुकली श्री. शिवाजी हायस्कूल बस स्थानक परिसरात आढळून आली. बालिकेची सुटका करून तिला पोलिस स्टेशनमध्ये आणण्यात आले. त्यानंतर बाल कल्याण समितीच्या आदेशानुसार, तिच्या संरक्षणासाठी दि लव ट्रस्ट अनाथालय, बुलडाणा येथे दाखल करण्यात आले.

ही कारवाई यशस्वी करण्यासाठी चिखली शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संग्राम पाटील, महिला पोलिस अंमलदार, ड्युटी ऑफिसर गणेश मैंद यांचे महत्त्वपूर्ण योगदान लाभले. या प्रकरणी पुढील कायदेशीर कार्यवाही बाल कल्याण समिती, बुलडाणा यांच्या माध्यमातून केली जात आहे.

### अफगाणिस्तानमधील तालिबानच्या सरकारला रशियाची मान्यता

मॉस्को : रशियाने अफगाणिस्तानातील तालिबान सरकारला मान्यता दिली आहे. तालिबानने नियुक्त केलेले नवीन अफगाण राजदूत गुल हसन यांना स्वीकारल्याचे रशियाने जाहीर केले आहे. अफगाणिस्तानमध्ये २०२१ मध्ये तालिबानच्या नेतृत्वाखालील सरकार सत्तेवर आले. या सरकारला मान्यता देणारा रशिया हा जगातील पहिला देश आहे.

''आम्हाला विश्वास आहे की इस्लामिक अमीरात ऑफ अफगानिस्तानच्या सरकारला अधिकृत मान्यता देण्याच्या निर्णयामुळे दोन्ही देशांतील विविध क्षेत्रात द्विपक्षीय सहकार्याच्या विकासाला चालना मिळेल'' असे प्रसिद्धीपत्रक रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने काढले आहे. रशियाचे उप परराष्ट्र मंत्री आंद्रे रुडेन्को यांनी मॉस्कोमध्ये झालेल्या एका कार्यक्रमानंतर अफगाण राजदूत गुल हसन यांची भेट घेत त्यांचं प्रमाणपत्र स्वीकारलं आहे.

तालिबान सरकारने रशियाच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. रशियाच्या निर्णयामुळे दोन्ही देशातील संबंध मजबूत होण्यास मदत होईल, असा विश्वास तालिबान सरकारने व्यक्त केला आहे. ''आमच्या संबंधांच्या इतिहासातील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे'' असे तालिबानचे परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्ताकी म्हणाले.

# चंद्रपूर महापालिकेत 'हाय सिवेज सक्शन मशीन' दाखल; आधुनिक तंत्रज्ञानाने स्वच्छतेला येणार वेग

**दैनिक आपला विदर्भ**




**पंढरपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर शहरात नाली सफाईचा कामात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत, चंद्रपूर महानगरपालिकेच्या स्वच्छता विभागात आजपासून 'ट्रक माउंटेड हाय सिवेज सक्शन मशीन' कार्यान्वित करण्यात आली आहे.

सदर मशीनद्वारे आता शहरातील विविध भागांतील भूमिगत नाले,गटार, मेनहोल्स, व नाल्यांची सफाई अधिक जलद, कार्यक्षम आणि यांत्रिक पद्धतीने होणार आहे. पारंपरिक पद्धतीने केल्या जाणाऱ्या स्वच्छता कार्यात लागणारा वेळ आणि श्रम यामध्ये मोठ्या प्रमाणात बचत होणार असून, विशेषतः पावसाळ्यातील नालेसफाई अधिक प्रभावीपणे करता येणार आहे.

महानगरपालिका आयुक्त विपीन पालीवाल यांच्या मार्गदर्शनात व स्वच्छता विभागाच्या देखरेखीखाली मशीनचे ट्रायल रन करण्यात आले.

यावेळी मशीनची शोषण क्षमता, दाब नियंत्रण, आणि जलप्रवाह व्यवस्थापन याची तपासणी करण्यात आली.सदर मशीनची क्षमता ही ४००० लिटरची असुन बंद गटारांमधून त्वरित सांडपाणी काढण्यासाठी, पावसाळ्यात नाले तुंबल्यास तत्काळ सफाईसाठी, गंध व दुर्गंधीमुक्त परिसर राखण्यासाठी विशेषतः उपयुक्त ठरणार आहे. सीवेज लाइन्स, ड्रेनेज सिस्टीम आणि इतर भागातील मलबा, गाळ आणि द्रव काढण्यासाठी हे मशीन शक्तिशाली सक्शन वापरते. मनपाच्या वतीने ही आधुनिक मशीन सार्वजनिक सेवेसाठी समर्पित करण्यात येत आहे. यामुळे शहर स्वच्छतेच्या दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा गाठण्यात आला आहे.

### हे कसे कार्य करते

मशीनमध्ये एक शक्तिशाली सक्शन पंप आहे जो नोजल किंवा ट्यूबद्वारे सीवेज लाइनमध्ये सक्शन तयार करतो. हे सक्शन मशीनच्या टाकीमध्ये चिखल आणि द्रव खेचते. नंतर टाकी रिकामी करून ती कचरा विल्हेवाटीसाठी नेली जाऊ शकते.

**फायदे**

**कार्यक्षमता:** ही मशीन कमी वेळेत सांडपाणी साफ करू शकते.
परिणामकारकता: ही मशीन मोठ्या प्रमाणातील नालीचा गाळ व चिखल देखील काढू शकते.

**सुरक्षा:** ही मशीन सफाई कामगारांना धोकादायक परिस्थितीत काम करण्यापासून वाचवते.
पर्यावरण संरक्षण: हे यंत्र सांडपाणी स्वच्छ करून पर्यावरणाचे प्रदूषणापासून संरक्षण करते.

**खर्च प्रभावी:** या यंत्रामुळे सांडपाणी साफ करण्याचा खर्च कमी होऊ शकतो.

# मोकाट जनावरांच्या बंदोबस्तासाठी मनपा घेणार धडक मोहीम हाती



**दैनिक आपला विदर्भ**

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** चंद्रपूर शहर महानगरपालिकेतर्फे शहरातील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्याची धडक मोहीम हाती घेण्यात येणार असुन जनावरांना मोकाट सोडुन वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या जनावरांच्या मालकांवर कारवाई करण्यात येणार आहे.

शहरातील बंगाली कॅम्प परिसरात मोठ्या प्रमाणात मोकाट जनावरांचा वावर असल्याने नागरिकांना त्रास होत असल्याबाबत तसेच अपघात होण्याची शक्यता असल्याबाबत नागरिकांच्या तक्रारी मनपास प्राप्त होत आहेत. त्याचप्रमाणे जिल्हा शांतता समितीव्दारादेखील सदर प्रकारची मोकाट जनावरांचे त्रासाबाबत तक्रार प्राप्त झालेली आहे.त्यानुसार मनपाद्वारे मोहीम हाती घेण्यात येणार आहे.

शहरातील मुख्य तसेच इतर मार्गांवर, रस्त्यांवर मोकाट जनावरे ठाण मांडून बसून राहात असल्याने वाहनधारकांचा अपघात होण्याची शक्यता अधिक असते. याबाबत मनपातर्फे यापुर्वीही कारवाई करून जनावरांच्या मालकांना समज देण्यात आली आहे.समज दिल्यानंतर काही काळ ते आपल्या जनावरांवर लक्ष देऊन ते रस्त्यावर येणार नाही याची काळजी घेतात,मात्र त्यानंतर पुन्हा जनावरांना मोकाट सोडुन देण्यात येते असे निदर्शनास आले होते,यापुर्वी अश्या ३३ मोकाट जनावरांच्या मालकांवर पोलिसात तक्रार करून गुन्हा नोंद करण्यात आली होती

बंगाली कॅम्प परिसरातील मोकाट जनावरांचा बंदोबस्त करण्याकरिता प्रथमतः सदर परिसरामध्ये मोकाट जनावरांवर कार्यवाहीबाबत तसेच जे नागरिक त्यांची जनावरे रस्त्यावर मोकाट सोडतात त्यांना सुचित करण्याच्या दृष्टीकोनातुन वृत्तपत्राच्या माध्यमातुन तसेच ऑटोव्दारे सुचना देण्यात येत आहेत. त्यानंतर संबंधितांना कळविण्यात येऊन परिस्थितीत सुधार न झाल्यास कारवाई करण्यात येणार आहे.

# बजरंगी भाईजानची मुन्नी दिसणार साऊथ चित्रपटात

**मुंबई/प्रतिनिधी :** इतक्या लहान वयातच उत्तम अभिनय करून सर्वांचे मन जिंकणारी बजरंगी भाईजानची गोंडस मुन्नी तुम्हाला आठवत असेलच. मुन्नीची भूमिका साकारणारी हर्षाली मल्होत्रा आता मोठी झाली आहे. आता ती साऊथ चित्रपटसृष्टीत पदार्पण करण्यास सज्ज आहे. तिनं स्वतः तिच्या सोशल मीडिया अकाउंटवर चित्रपटातील पोस्टर शेअर केलं आहे. आता ती चित्रपटामध्ये दिसणार यामुळं तिचे चाहते खूप खुश झाले आहेत. दरम्यान नंदमुरी बालकृष्णाचा आगामी चित्रपट अखंड २ हा खूप चर्चेत आहे. या चित्रपटामध्ये हर्षाली जननीच्या भूमिकेत दिसणार आहे. तिचा या चित्रपटातील फर्स्ट लूक हा निर्मात्यांनी शेअर केला आहे. यामध्ये ती पारंपारिक लूकमध्ये खूपच सुंदर दिसत आहे. निर्मात्यांनी आपल्या पोस्टमध्ये लिहिलं. एका देवदूताचे हास्य आणि सोन्याचे मन. बजरंगी भाईजान फेम हर्षाली मल्होत्रा अखंड २मधून जननी म्हणून पदार्पण करत आहे. अखंड २ थंडावम २५ सप्टेंबर रोजी दसऱ्याला चित्रपटगृहात प्रदर्शित होत आहे.

तसेच हर्षालीनं देखील एक भावनिक पोस्ट शेअर करून आनंद आणि कृतज्ञता व्यक्त केली आहे. चित्रपटातील पोस्टर शेअर करताना तिनं लिहिलं, एक शांतता होती जी सर्व काही सांगून गेली, मनात एक हास्य राहिले. एक छोटी मुन्नी होती, मात्र ती आठवणींमध्ये मोठी झाली. आज मी पुन्हा एक कथा घेऊन आली आहे, यावेळी शब्दांसह, मी एका नवीन प्रकाशासारखी पसरली आहे. मुन्नी फक्त एक पात्र नव्हती, ती एक भावना होती, एक आठवण होती, एका हृदयाचे ठोके होते, ते असे काहीतरी होते, जे तुमच्या आणि माझ्याबरोबर राहिले. इतक्या वर्षांनंतरही, मी तुमचे प्रेम धरून आहे. धीरानं, शांतपणे आणि कृतज्ञतेनं भरलेल्या हृदयानं. जेव्हा तुम्ही मुन्नीची आठवण करत होता, यावेळी मी तयारी करत होते. शिकत होते, वाढत होते आणि बनत होते. जेणेकरून एके दिवशी, जेव्हा मी परत येईन, तेव्हा मी फक्त त्या लहान मुलीच्या रूपातच नाही, तर तुमच्याबरोबर पडद्यावर सर्वकाही पुन्हा अनुभवण्यास तयार असलेल्या व्यक्तीच्या रूपात परत येईन. आता, मी शेवटी तिला तुमच्याबरोबर शेअर करण्यास तयार आहे. जनानीला भेटा – एक नवीन कथा, एक नवीन भावना, माझा एक नवीन अध्याय. ती हसते, ती स्वप्ने पाहते, ती मनापासून बोलते आणि मी प्रत्येक दृश्यात माझा आत्मा ओतला आहे.

# पाण्याच्या हौदात बुडून चिमुकलीचा करून अंत

## देऊळगाव राजा येथील हृदय पिळून टाकणारी घटना

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** देऊळगाव राजा येथील २ वर्षीय ईश्वरीचा पाण्याच्या हौदात बुडून करून अंत झाल्याची हृदयद्रावक घटना ३ जुलै रोजी सायंकाळी घडली आहे.सदर घटनेने हरणे कुटुंबियांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.तर संपूर्ण परिसरावर शोककळा पसरली आहे.

देऊळगाव राजा गल्लतील सर्वांची लाडकी २ वर्षीय निरागस ईश्वरी अंकुश हरणे रा. त्र्यंबकनगर या चिमुकलीचा ३ जुलै रोजी सायंकाळी पाण्याच्या हौदात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. सायंकाळची वेळ असल्यामुळे ईश्वरीची आई घरातील काम करत होती. ईश्वरी समोरच्या हॉलमध्ये बसलेली असतांना खेळत खेळत ती अचानक ती बाहेर निघून गेली. दोन तास ईश्वरीचा शोध घेऊन सुद्धा ती मिळत नसल्याने अखेर नातेवाईकांनी देऊळगाव राजा पोलीस स्टेशनला धाव घेतली.सदर घटनेची प्रभारी ठाणेदार आशिष रोही यांनी तात्काळ दखल घेऊन घटनास्थळी धाव घेत पोलिसांचा फौजफाटा घेऊन चौकशी सुरू केली. आजुबाजुला असलेल्या पाण्याच्या हौदाची पाहणी करत असतांना पाण्याच्या हौदातचं ईश्वरीचा मृत्यूदेह आढळून आला. तिला तात्काळ देऊळगाव राजा ग्रामीण रुग्णलयात दाखल करण्यात आले. परंतु तेथे नेण्या अगोदरच तिची प्राणज्योत मालवली होती. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त आहे.काही दिवसांपूर्वी बुलढाण्यात दुर्घटना घडली होती. खामगाव शहरातील जामोदे कुटुंबातील माय लेकीवर काळाने घाला घातला होता. देवदर्शनासाठी मलकापूरमधील निंबा देवी येथे गेलेल्या मायलेकीचा विश्वगंगा नदीत दुर्दैवी मृत्यू झाला होता. पुनम मयूर जामोदे वय ३२ व चिमुकली आर्वी जामोदे वय ५ यांच्यासह निंबा देवी संस्थान येथे देवीच्या दर्शनासाठी गेले होते. नदी पात्राजवळ आई पुनम जामोदे आणि चिमुकली आर्वी हे दोघे पाय धुण्यासाठी गेले असता आर्वी हिचा पाय खोलात गेला आणि ती पाण्यात बुडाली. मुलीला वाचविण्यासाठी आईने सुद्धा पाण्यात उडी घेतली असता ती सुद्धा पाण्यामध्ये वाहून गेली होती. सदर घटनेची आठवण करून नागरिक हळहळ व्यक्त करीत आहेत.

# कामात कुचराई करणाऱ्यांची गय न करता शेवटच्या घटकांपर्यंत आरोग्य सेवा पुरवा - केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** सर्वसामान्य गोरगरीब जनतेपर्यंत आरोग्य सेवा सहज ,सुलभ आणि माफक दरात पोहचविण्याचा केंद्र सरकारचा हेतू आहे . हा हेतू साध्य करण्यासाठी आणि शेवटच्या घटकांपर्यंत आरोग्य सेवा पुरविण्याचे काम आरोग्य यंत्रणेने प्रामाणिकपणे कराव, असे आवाहन करत कामात कुचराई करणाऱ्यावर कडक करवाई करावी, अशा सूचना केंद्रीय आयुष, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री ना. प्रतापराव जाधव यांनी आज दिल्यात.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समितीच्या सभागृहात आरोग्य विभागाची आढावा बैठक त्यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवारी संपन्न झाली त्यावेळी त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीला जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाबराव खरात, आरोग्य उपसंचालक डॉ भंडारी, आरोग्य विभागाचे राज्य समन्वयक सोहम वायाळ, डॉ जीवन बच्छाव, उपसचिव विशाल गुप्ता, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ दत्तात्रय बिराजदार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अमोल गीते उपस्थित होते.

### आरोग्य विभागाचा घेतला आढावा




यावेळी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री ना प्रतापराव जाधव यांनी जिल्ह्यातील आरोग्य विभागात रिक्त असलेल्या जागेचा आढावा घेत रिक्त जागा त्वरित भरण्याच्या सूचना दिल्या. ग्रामीण भागातील शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सेवा पोहोचवण्याच्या दृष्टिकोनातून आरोग्य यंत्रणेतील सर्व घटकांनी सामूहिकरित्या प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे. क्षय मुक्त भारत बनविण्यासाठी निक्षयमित्र योजनेत सर्व अधिकारी व कर्मचारी, स्वयंसेवी संघटना, लोकप्रतिनिधी यांना सहभागी करुन घ्या, अशा सूचना यावेळी केद्रीय राज्यमंत्री ना. जाधव यांनी दिल्या.

ग्रामीण भागात आरोग्य यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यन्वीत करण्यासाठी भौतीक सुविधा पोहचविणे आणि बांधकाम हे चांगल्या दर्जाचे करून घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले . पीएमजेवाय योजने अंतर्गत आयुष्मान कार्डची संख्या वाढविण्याच्या दृष्टिकोनातून ग्रामपंचायत, तालुकास्तरावर शिबिरे आयोजित करून एक महिन्याच्या आत सर्व लोकांचे आयुष्यमान कार्ड काढण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. जिल्ह्यातील जन्मदर आणि मृत्युदराचाही त्यांनी आढावा घेतला. जिल्हा सामान्य रुग्णालयात अमृत औषधालय आणि जन औषधी केंद्र सुरू करा. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालय येथे येणाऱ्या प्रत्येक रुग्णांना उपचार सुविधा सहज उपलब्ध करून द्याव्यात. नागरिकांच्या तक्रारी आल्यास त्याबाबत आरोग्य अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित केली जाईल, असे स्पष्ट निर्देश केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री ना. जाधव यांनी यावेळी दिले.

## डोणगावातील अतिक्रमणांचा मुद्दा ऐरणीवर

# अतिक्रमणाकडे दुर्लक्ष करणे ग्रामसेवकाला भोगले डोणगावचे ग्रामविकास अधिकारी दीपक तांबारे निलंबित

### क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या देवेंद्र आखाडे यांच्या तक्रारीवरून कारवाई

**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव/प्रतिनिधी :** डोणगाव ग्रामपंचायत येथे कार्यरत असलेले ग्रामसेवक दीपक तांबारे यांना २ जुलै २०२५ रोजी पंचायत समिती मेहकर गटविकास अधिकारी खरात यांच्या आदेशानुसार निलंबित करण्यात आले आहे. ही कारवाई देवेंद्र रावसाहेब आखाडे (रा. डोणगाव) यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर करण्यात आली आहे.

डोणगाव अतिक्रमण न काढंणे वरिष्ठाच्या आदेशाचे पालन न करणे अतिक्रमण धारकांना पाठिशी घालून प्रोत्साहन देणे अतिक्रमण बाबत अहवाल येऊन सुद्धा वारंवार आदेश देऊन कारणे दाखवा नोटीस देऊन सदर ग्रामपंचायत अधिकारी यांनी, हलगर्जीपणा करत कुठलीही कारवाई केली नाही म्हणून संबंधीत तक्रारीवर चौकशी करून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) १९६७ च्या नियम ३ चार भंग केला त्यामुळे शासन आदेशान-ुसार कारवाई केली आहे.सदर ग्रामसेवकाने ग्रामपंचायतीच्या कामकाजात नियमबाह्य व अनियमित स्वरूपाची कागदपत्रे सादर केल्याचे निदर्शनास आले. प्रधानमंत्री आवास योजनेच्या घरकुलांचे प्रस्ताव विविध मुद-तीत सादर केले नाही व संबंधित ग्रामसेवककाकडून कार्यक्षमतेचा अभाव,दैनंदिन गैरहजर,राहने,या संपूर्ण प्रकरणाची चौकशी केल्यानंतर मेहकर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी सदर आदेशानुसार निलंबनाची कार्यवाही अंमलात आणली.






#### गावात अनेक ठिकाणी ग्रामपंचायतच्या जागेवर पक्के अतिक्रमण

डोणगाव परिसरातील सर्वात मोठे गाव आहे. डोणगाव गावाची लोकसंख्या ही तीस ते पस्तीस हजाराच्या वर आहे. गावाच्या दृष्टीने एक डोणगाव मध्ये पाहिजे तशा कोणत्याही सोयी सुविधा उपलब्ध नाहीत व्यवसायासाठी जागा नाही. त्यामुळे नागरिक मिळेल त्या ठिकाणी आपला व्यवसाय धातू अतिक्रमण करीत आहे अशाच अतिक्रमणातून डोणगाव शहरात अनेक ठिकाणी पक्के अतिक्रमण करून त्यावर पक्के बांधकाम करण्यात आले आहे. याकडे मात्र डोणगाव ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष झाले असल्याचे चित्र दिसून येत असून गोरगरिबांच्या अतिक्रमण हटविण्यात येते.मात्र, काही धनदांगड्या लोकांनी केलेले पक्के अतिक्रमण सुद्धा उठवावे, याकडे लोकप्रतिनिधी लक्ष द्यावे, अशी मागणी ही होत आहे.

#### डोणगाव येथील ग्रामपंचायत हद्दीतील गट नंबर १२३ मधील पक्के बांधलेले अतिक्रमण हटणार

ग्रामपंचायत मालकीच्या ई क्लास गट क्रमांक १२३ मधील अतिक्रमांच्या मागील अनेक वर्षांपासून डोणगावातील काही सुज्ञ नागरिकांनी सातत्याने तक्रारी केल्या होत्या मात्र त्यावर ग्रामपंचायत प्रशासनाने फक्त थातूरमातूर कारवाई करून अतिक्रमण वाढवण्याचे काम केले व कच्ची बांधकाम पक्के झाले मात्र अतिक्रमण आटवण्यात आले नाही अनेक अतिक्रमण धारकांनी तर आपले पक्के बांधकाम करून जागा भाड्याने सुद्धा दिलेल्या आहेत अशा वेळेस ग्रामपंचायत प्रशासन कारवाईत दिरंगाई करून वेळ मारण्याचे काम करत आहे.? मात्र आता तरी ग्रामपंचायत प्रशासन झालेले अतिक्रमण काढेल.?



देवेंद्र आखाडे
तक्रारकर्ते

## विविध वृत्त...

### ७ जुलै रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन

**दैनिक आपला विदर्भ**

**वाशीम/प्रतिनिधी :** दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. जुलै महिन्यातील लोकशाही दिन ७ जुलै २०२५ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. नागरीकांनी जिल्हास्तरीय लोकशाही दिनातील तक्रार अर्ज जिल्हा, तालुका लोकशाही दिनामध्ये सादर केल्यानंतर विहीत नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसह लोकशाही दिनामध्ये १५ दिवस आधी दोन प्रतीत पाठविणे आवश्यक आहे. असे निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी कळविले आहे.

### तालुक्यातील सरपंच पदासाठी आरक्षण प्रक्रिया ८ जुलै रोजी

**वाशीम/प्रतिनिधी :** मंगरुळपीर तालुक्यातील मंगरुळपीर तालुक्यातील सन २०२५ ते २०३० दरम्यान सार्वत्रिक निवडणूकीव्दारे गठीत होणाऱ्या ग्रामपंचायत सरपंच पदाकरीता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्वसाधारण प्रवर्गाचे आरक्षण (प्रवर्गनिहाय महिला आरक्षण तसेच सर्वसाधारण महीला आरक्षणासह) ८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता जुनी पंचायत समिती सभागृह, मंगरुळपीर येथे काढण्यात येणार आहे. तरी सर्व संबंधित नागरिकांनी व ग्रामपंचायत सदस्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन तहसीलदार रवी राठोड यांनी केले आहे.

### मालेगाव तालुक्यातील सरपंच पदासाठी आरक्षण प्रक्रिया ८ जुलै रोजी

**वाशीम/प्रतिनिधी :** मालेगाव तालुक्यातील सरपंच आरक्षण निश्चित करण्याकरीता १३ जुन २०२५ रोजी पुढील पाच वर्षाकरिता अधिसुचना प्रसिध्द केली आहे. मालेगाव तालुक्यातील सन २०२५ ते २०३० दरम्यान सार्वत्रिक निवडणूकीव्दारे गठीत होणाऱ्या ग्रामपंचायत सरपंच पदाकरीता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व सर्वसाधारण प्रवर्गाचे आरक्षण (प्रवर्गनिहाय महिला आरक्षण तसेच सर्वसाधारण महीला आरक्षणासह) ८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, मालेगाव येथे काढण्यात येणार आहे. तरी सर्व संबंधित नागरिकांनी व ग्रामपंचायत सदस्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन तहसीलदार दीपक पुंडे यांनी केले आहे.

### लोकशाही दिन ७ जुलैला

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो. त्यानुसार जुलै महिन्याचा लोकशाही दिन सोमवार, दि. ७ जुलै २०२५ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात घेण्यात येणार आहे.

लोकशाही दिनासाठी तक्रारदारांनी उपस्थित राहावे, उपस्थित राहणे शक्य नसल्यास तक्रारी रजिस्टर पोस्टाने लोकशाही दिनाआधी जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचतील अशाप्रकारे पाठवावेत, असे प्र. निवासी उपजिल्हाधिकारी सुहासिनी गोणेवार यांनी कळविले आहे.

## शहरातील ६२ जिर्ण इमारतींना मनपाची नोटीस

**दैनिक आपला विदर्भ**

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** महापालिका क्षेत्रातील शिकस्त इमारतींपासून परिसरातील रहिवाशांच्या जीविताला निर्माण होऊ शकणारा संभाव्य धोका पाहता चंद्रपूर महानगरपालिकेने कारवाई करण्यास सुरवात केली असुन मागील काही दिवसात ६२ जीर्ण इमारतींना नोटीस देण्यात आली आहे.

पावसाळ्यात दरवर्षी महापालिका क्षेत्रातील जीर्ण व शिकस्त इमारतींचा सर्व्हे करण्यात येतो. यात आढळलेल्या धोकादायक इमारतीतील रहिवाश्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २६४ अन्वये नोटीस जाहीर करण्यात येते. चंद्रपूर मनपातर्फे झोन १ अंतर्गत ३०, झोन २ अंतर्गत २० तर झोन ३ अंतर्गत १२ अश्या एकुण ६२ धोकादायक इमारतींना नोटीस देण्यात आली आहे.

नोटीसनुसार धोकादायक इमारतीमध्ये वास्तव्यास असलेल्या सर्व व्यक्तींना व महत्वाचे साहित्य अन्यत्र सुरक्षित ठिकाणी तात्काळ स्थलांतरीत होण्यास सांगण्यात आले असुन त्वरित आपल्या इमारतीची दुरुस्ती करुन घेण्याचे तसेच त्यांनतर आपल्या इमारतीचे नोंदणीकृत स्ट्रक्चरल अभियंता यांचेकडून सर्वेक्षण करुन त्याबाबतचे स्ट्रक्चरल स्टॅबिलिटी सर्टिफिकेट मनपा कार्यालयास सादर करण्यास कळविण्यात आले आहे.

अश्या ६ इमारती यापुर्वी मनपाने निर्लेखित केल्या आहेत. पावसाळ्यापूर्वी सदर कारवाई दरवर्षी मनपातर्फे करण्यात येते मात्र काही मालमत्ताधारक जिवाची पर्वा न करता त्याच इमारतीत तळ ठोकून राहतात. यामुळे परिसरातील रहिवाशांच्या जिवालासुद्धा धोका निर्माण होतो. मग अश्या प्रसंगी निष्कासीत करण्याची अथवा नियमानुसार कारवाई मनपातर्फे करण्यात येते.







## मंगळवारी तालुक्यातील ९८ सरपंच पदासाठी आरक्षण सोडत

**दैनिक आपला विदर्भ**

> **इच्छुकांचे लक्ष लागले सरपंच पदाच्या आरक्षणाकडे**

**मेहकर/प्रतिनिधी :** तालुक्यातील ९८ ग्रामपंचयतीचे सरपंचाची पदे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमचे कलम ३०(४) (५) अन्वये तसेच मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मधील तरतूदीनुसार सन २०२५ ते २०३० दरम्यान मेहकर तालुक्यातील सार्वत्रिक निवडणुकीव्दारे गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडत तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व खुल्या प्रवर्गा अंतर्गत स्त्रीकरिता आरक्षण सोडत ८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालय, मेहकर येथे निश्चीत करण्यात येणार आहे.सदर आरक्षण सोडतीकरिता मेहकर तालुक्यातील सर्व लोकप्रतीनिधी, राजकीय पक्षांचे पदाधिकारी व नागरिकांनी जास्तीत-जास्त संख्येने सदर ठिकाणी उपस्थित राहावे, असे आवाहन मेहकरचे तहसीलदार निलेश मडके यांनी केले आहे.

सन २०२५ ते २०३० दरम्यान मेहकर तालुक्यातील सार्वत्रिक निवडणुकीब्दो गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण निश्चितीबाबतची जाहीर सुचना प्रसिध्द करणेबाबत ग्रामपंचायत अधिनियम चे कलम ३०(४)(५) अन्वये तसेच मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मधील तरतूदीनुसार सन २०२५ ते २०३० दरम्यान मेहकर तालुक्यातील सार्वत्रिक निवडणूकीव्दारे गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडत ८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता मेहकर तहसील कार्यालय येथे निश्चीत करण्यात येणार आहे.तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व खुल्या प्रवर्गा अंतर्गत स्त्रीकरिता आरक्षण सोडत त्याच दिवशी तालुका स्तरावर कढण्यात येणार आहे. तरी मेहकर तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी यांनी आपले मंडळ अंतर्गत येणाऱ्या ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडील सरपंच आरक्षण सोडत जाहीर सुचना प्रसिध्दी अहवाल प्राप्त करुन घ्यावा, त्यानंतर आपले मंडळातील सर्व ग्रामपंचायत कार्यालये, ग्रा.म. अधि. कार्यालयाचे सुचना फलकावर जाहीर सुचना प्रसिध्द केल्याचा अहवाल कार्यालयास सादर करावा.अशा सुचना मेहकरचे तहसीलदार निलेश मडके यांनी दिल्या आहेत.

### खाकी वर्दीतील गुंडांना हाताशी धरून शक्तीपीठासाठी शेतकऱ्यांवर दडपशाही, राजू शेट्टी कडाडले

**सांगली/प्रतिनिधी :** खाकी वर्दीतील गुंडांना हाताशी धरून शक्तिपीठ महामार्गासाठी मुख्यमंत्र्यांकडून शेतकऱ्यांवर दडपशाही करण्यात येत आहे, असा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते आणि माजी खासदार राजू शेट्टींनी केलाय. शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याच्या मागणीसाठी आषाढी एकादशी निमित्ताने पंढरपूरमध्ये विठ्ठलाला साकडे घालण्यासाठी शेतकऱ्यांसह राजू शेट्टी रवाना झालेत, या प्रसंगी ते अंकली येथे बोलत होते. नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाविरोधात महाराष्ट्रातल्या १२ जिल्ह्यांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीने आंदोलन केली जात आहेत. शक्तिपीठविरोधात महाविकास आघाडी आणि शेतकरी संघटना देखील एकत्र येऊन आंदोलन करीत आहेत. महायुती सरकारला शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्याची सुबुद्धी द्यावी, हे मागणं थेट पंढरपूरच्या विठ्ठलाला घालण्याचा निर्णय महाविकास आघाडी आणि शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टींकडून घेण्यात आला होता.

# अन् तहसील कार्यालयातील घानीची स्वच्छता

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** येथील तहसील कार्यालयाची इमारत कोट्यावधी रुपयाचा खर्च करून नव्याने उभारण्यात आली आहे. सुसज्ज असलेली इमारत मात्र, तंबाखू , गुटख्याच्या पिचकाऱ्याने घाणीचे साम्राज्य निर्माण केले होते. विशेष म्हणजे तहसीलदार यांच्या कक्षाच्या बाजुलाच असलेल्या ठिकाणी कर्मचारी नागरिकांनी गुटखा, तंबाखू खाऊन थुंकल्याने तहसील कार्यालय परिसरात सर्वत्र घाण निर्माण केली होती. याबाबत दैनिक आपला विदर्भ मध्ये ३ जुलै रोजी तहसील कार्यालय गुटख्याच्या पिचकाऱ्याने रंगले या मथळ्याखाली वृत्त प्रकाशित करतात दैनिक आपला विदर्भ वृत्ताची दखल घेत तहसील कार्यालयातील घाण्याची स्वच्छता करण्यात आली आहे. त्याचबरोबर गुटखा व तंबाखू खाणाऱ्या अधिकारी कर्मचारी व नागरिकांना कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च करून मेहकर येथे तहसील कार्यालयाची नवीन इमारत उभारण्यात आली आहे.सदर इमारतीची रंगरंगोटी करून त्याचबरोबर इतर सोयीसुविधा नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.मात्र, तहसील कार्यालयातील अधिकारी कर्मचारी त्याचबरोबर कार्यालयात येणाऱ्या तालुक्यातील नागरिकांनी तंबाखू गुटखा खाऊन जागोजागी पिचकाऱ्या मारल्या होत्या. त्यामुळे तहसील कार्यालय हे सर्वत्र घाणीने माखले असल्याचे चित्र दिसून आले होते. विशेष म्हणजे तहसीलदार यांच्या कक्षाच्या बाजुलाच सुद्धा गुटख्याच्या पिचकाऱ्या मारलेल्या होत्या. मेहकर येथील तहसील कार्यालयातील गुटखा तंबाखू मुळे झालेल्या घाणी संदर्भात दैनिक आपला विदर्भ मध्ये ३ जुलै रोजी तहसील कार्यालय गुटख्याच्या पिचकाऱ्यांनी रंगले. या मधल्या खाली वृत्त प्रकाशित होतात.मेहकर तहसील प्रशासनाच्या वतीने तहसील कार्यालयातील ठिकठिकाणी झालेली घाण साफसफाई करून स्वच्छ केली आहे. त्याचबरोबर गुटख्याच्या पिचकाऱ्याने झालेली घाण साफ करून परिसराची स्वच्छता करण्यात आली आहे.






**आपला विदर्भ IMPACT**


तहसील कार्यालय गुटख्याच्या पिचकारीने रंगले ; कुणी या पिचकारी मारा सर्वत्र घाणीचे साम्राज्य

तहसीलदारांच्या कक्षा जवळही गुटख्याच्या पिचकाऱ्या

दैनिक आपला विदर्भ

तहसीलदार यांच्या कक्षाच्या बाजुलाच घाणीचे साम्राज्य